महाराष्ट्रातील जनतेचा आक्रोश, दैनिक नांदगांव

# आवाज

संपादक : भगवान सोनवणे

WWW.DAILYAWAZ.COM

RNI Reg. No.: MAHMAR/2014/66104 ■ वर्ष - १२ वे ■ अंक क्र. - २०६ ■ बुधवार दि.०४ मार्च २०२६ ■ किंमत - १ रूपया ■ पाने - ४

* उत्सुकता *




## अमेरिका-इस्त्रायली हल्ल्यात इराणमधील १५० हून अधिक विद्यार्थिनींचा मृत्यू

**दै. आवाज वृत्तसेवा...**

इराणमधील राज्य माध्यम 'प्रेस टीव्ही'च्या वृत्तानुसार, होर्मोज्गान प्रांतातील मिनाब प्रायमरी स्कूलवर शनिवारी अमेरिका-इस्रायली हवाई व क्षेपणास्त्र हल्ला करण्यात आला. या हल्ल्यात १५० हून अधिक शाळकरी मुलींचा मृत्यू झाल्याचा दावा करण्यात आला असून सुमारे १०० जण जखमी झाल्याचे सांगितले जात आहे.

अंत्ययात्रेत हजारोंचा सहभाग

हल्ल्यानंतर परिसरात तीव्र संताप व्यक्त करण्यात आला. हजारो नागरिक रस्त्यावर उतरले आणि मृत विद्यार्थिनींच्या अंत्ययात्रेत सहभागी झाले. माध्यमांनी प्रसिद्ध केलेल्या दृश्यांमध्ये मोठा जनसमुदाय या घटनेचा निषेध करताना दिसून आला. एक्सवरील पोस्टमध्ये प्रेस टीव्हीने या हल्ल्याला अमेरिका आणि इस्रायली राजवटीचा दहशतवादी हल्ला असे संबोधत शहीद झालेल्यांना श्रद्धांजली वाहिली. दुसऱ्या पोस्टमध्ये १६५ हून अधिक निष्पाप शाळकरी मुलींच्या अंत्ययात्रेत लोक मोठ्या संख्येने सहभागी झाल्याचे नमूद करण्यात आले आहे.

'युनेस्को'कडून गंभीर चिंता व्यक्त

'यूएन न्यूज'च्या अहवालानुसार मृतांचा आकडा सुमारे १५० पर्यंत पोहोचला आहे. दरम्यान, 'युनेस्को'ने या हल्ल्यांबाबत गंभीर चिंता व्यक्त केली आहे. शिक्षणासाठी समर्पित ठिकाणांवर हल्ले करणे आंतरराष्ट्रीय मानवतावादी कायद्याचे उल्लंघन असल्याचे सांगत युनेस्कोने विद्यार्थ्यांचे व शिक्षकांचे संरक्षण सुनिश्चित करण्याचे आवाहन केले आहे.

## अमेरिका-इस्त्रायल-इराण तणावाच्या पार्श्वभूमीवर, तेथे अडकलेल्या भारतीयांना स्वदेशी आणण्याचे प्रयत्न सुरु

**दै. आवाज वृत्तसेवा...**

मुंबई - मध्य पूर्वेतील अमेरिका-इस्रायल-इराण तणावाच्या पार्श्वभूमीवर, तेथे अडकलेल्या भारतीयांसाठी दिलासादायक बातमी समोर आली आहे. सोमवारी रात्री दोन विशेष विमानांनी ६०० हून अधिक भारतीय आणि इतर अनेक देशांतील नागरिकांना सुरक्षितपणे भारतात आणले. दुबई आणि अबू धाबी येथून उड्डाण घेतलेली दोन्ही विमाने दिल्ली विमानतळावर उतरली, ज्यामुळे दीर्घकाळ अडकलेल्यांना मोठा दिलासा मिळाला.आखाती देशांमध्ये अडकलेल्या भारतीयांना बाहेर काढण्यासाठी प्रयत्न सुरू आहेत. सोमवारी संध्याकाळी उशिरा नागरी उड्डाण मंत्री राम मोहन नायडू यांनी मंत्रालयाच्या अधिकाऱ्यांसोबत एक महत्त्वाची आढावा बैठक घेतली. मध्य पूर्वेत अडकलेल्या प्रत्येक भारतीयाला सुरक्षितपणे परत आणण्यासाठी शक्य ती सर्व पावले उचलण्याची गरज या बैठकीत अधोरेखित करण्यात आली.

बैठकीनंतर काही तासांतच, तीन दिवसांच्या विश्रांतीनंतर पहिले विमान दिल्लीत पोहोचले. हे विमान एतिहाद एअरवेजचे होते ज्यामध्ये ३१० प्रवासी होते, त्यापैकी बहुतेक भारतीय नागरिक सध्याच्या परिस्थितीमुळे तिथे अडकले होते.पहिल्या विमानानंतर, काल रात्री उशिरा आणखी एक मोठा दिलासा मिळाला.

मंगळवारी पहाटे २:४० च्या सुमारास, ३२५ प्रवाशांना घेऊन एमिरेट्स एअरलाइन्सचे विमान दिल्ली विमानतळावर उतरले. या विमानातही बहुतेक भारतीय नागरिक होते, जरी त्यात काही परदेशी नागरिकांचा समावेश होता जे संकटामुळे निघू शकले नाहीत.

दोन्ही विमानांद्वारे एकूण ६०० हून अधिक लोकांना सुरक्षितपणे भारतात आणण्यात आले, जे सध्याच्या तणावपूर्ण परिस्थितीत एक मोठे यश मानले जात आहे.

सरकार आणि विमान कंपन्या परिस्थितीवर बारकाईने लक्ष ठेवून आहेत. मध्य पूर्वेतील हवाई क्षेत्रावरील निर्बंध शिथिल झाल्यास इंडिगो जेद्दाहहून भारतात १० विशेष मदत उड्डाणे चालवू शकते यावर नागरी उड्डाण मंत्रालयात झालेल्या बैठकीत चर्चा झाली. यामुळे अधिक भारतीयांना लवकर परत आणण्यास मदत होईल.

## बनावट ग्रामसेवक आदेशप्रकरणी कारवाईचे जिल्हा परिषद चे मुख्य कार्यकारी अधिकारी यांचे संबंधित विभागास चौकशीचे आदेश

**दै. आवाज वृत्तसेवा...**

नाशिक-:जिल्हा परिषद नाशिक अंतर्गत ग्रामपंचायत विभागाशी संबंधित बनावट नियुक्ती आदेश प्रकरण नुकतेच उघडकीस आले असून, प्रशासनाने याची गंभीर दखल घेत तत्काळ कारवाई सुरू केली आहे. जिल्हा परिषद जिल्हा निवड समिती, ग्रामपंचायत विभाग यांच्या नावाने जावक क्रमांक जिपसां/ग्रापं/आस्था ४/प्रा. सेवक/२०२६ असा बनावट नियुक्ती आदेश तयार करून संबंधित व्यक्तीस ग्रामसेवक पदावर हजर राहण्याबाबत कळविण्यात आले होते. या आदेशाच्या आधारे संबंधित व्यक्ती नाशिक पंचायत समिती येथे २७ फेब्रुवारी रोजी ग्रामसेवक म्हणून हजर होण्यासाठी आला असता हे प्रकरण संशयास्पद असल्याचे निदर्शनास आले. यासंदर्भात पंचायत समिती प्रशासनाच्या ही बाब निदर्शनास आली. त्यांनी तत्काळ ग्रामपंचायत विभाग जिल्हा परिषद यांच्या निदर्शनास आणून दिले. प्रकरणाचे गांभीर्य लक्षात घेत मुख्य कार्यकारी अधिकारी ओमकार पवार यांनी तत्काळ कारवाई करत संबंधितांविरुद्ध गुन्हा दाखल करण्याचे निर्देश दिले. प्राथमिक चौकशीत अक्षय सूर्यकांत चौधरी या व्यक्तीने बनावट नियुक्ती आदेश तयार करून शासन व जिल्हा परिषद प्रशासनाची फसवणूक करण्याचा प्रयत्न केल्याचे आढळून आले आहे. याप्रकरणी संबंधितांविरुद्ध कायदेशीर कारवाई करण्याची प्रक्रिया सुरू असून पोलिसांत गुन्हा नोंदविण्याचे काम प्रगतिपथावर आहे. तसेच या प्रकारामागील इतर कोणत्याही व्यक्तींचा सहभाग आहे का, याचीही सखोल चौकशी करण्यात येत आहे. जिल्हा परिषद प्रशासनाने स्पष्ट केले आहे की, सर्व नियुक्त्या या केवळ शासनमान्य प्रक्रियेनुसार, अधिकृत संकेतस्थळ, जाहिरात व पडताळणी याद्वारेच केल्या जातात. संशयास्पद कागदपत्रे किंवा व्यक्ती आढळल्यास तत्काळ संबंधित पंचायत समिती, जिल्हा परिषद कार्यालय किंवा जवळच्या पोलीस ठाण्यात माहिती द्यावी, असे आवाहन करण्यात आले आहे. या घटनेच्या पार्श्वभूमीवर जिल्हा परिषद प्रशासनाने सर्व विभागांना अधिक सतर्क राहण्याच्या सूचना दिल्या आहेत.

## डॉ.ज्ञानदेव बडवर यांना 'उदयोन्मुख वाहतूक व्यवस्थापन नेतृत्व' पुरस्कार

**दै. आवाज वृत्तसेवा...**

लासलगाव, प्रतिनिधी शिरवाडे वाकद येथील सुपुत्र डॉ.ज्ञानदेव विश्वास बडवर यांनी वाहतूक व्यवस्थापन क्षेत्रात केलेल्या उल्लेखनीय कामगिरीबद्दल त्यांना प्रतिष्ठित एल्डन ग्लोबल तर्फे 'उदयोन्मुख वाहतूक व्यवस्थापन नेतृत्व, धातू क्षेत्र (२०२६)' हा पुरस्कार जाहीर झाला आहे.




मुंबई येथे पार पडलेल्या इग्नाईट ३ लॉजिस्टिक्स अँड एस.सी.एम. समिट या परिषदेत हा सन्मान प्रदान करण्यात आला. या परिषदेत वाहतूक व्यवस्थापन क्षेत्रातील स्वयंचलन, डिजिटलीकरण आणि कृत्रिम बुद्धिमत्ता आधारित 'शून्य स्पर्श, शून्य प्रतीक्षा व शून्य धोका' तंत्रज्ञानावर विशेष भर देण्यात आला होता.

डॉ. बडवर सध्या मित्तल निपॉन स्टीलच्या पुणे प्रकल्पात महाव्यवस्थापक व वाहतूक व्यवस्थापन विभागप्रमुख म्हणून कार्यरत आहेत. त्यांच्या नेतृत्वाखाली पुणे प्रकल्पाने वाहतूक प्रक्रियेत आधुनिक तंत्रज्ञानाचा वापर करून उल्लेखनीय प्रगती साधली आहे.

धातू क्षेत्रात वाहतूक व्यवस्थापन हे केवळ सहाय्यक काम नसून व्यवसायासाठी धोरणात्मक प्रेरक शक्ती आहे. आम्ही पुणे प्रकल्पात सुरक्षितता संस्कृती, पारदर्शकता आणि प्रक्रियेतील शिस्त यावर विशेष लक्ष केंद्रित केले आहे. तंत्रज्ञानाच्या साहाय्याने खर्च कमी करून कार्यक्षमता वाढवण्यात आम्हाला यश आले असल्याची माहिती पुरस्कारार्थी बडवर यांनी दिली.

## ग्राहक रक्षक समितीच्या निफाड तालुका सचिवपदी शरद लोहकरे यांची निवड

**दै. आवाज वृत्तसेवा...**



श्री. शरद दामोधर लोहकरे

शिरवाडे वाकद :- भारत सरकार नोंदणीकृत ग्राहक सेवा सामाजिक बहुउद्देशीय संस्था संचलित ग्राहक रक्षक समितीच्या निफाड तालुका सचिव पदावर सामाजिक क्षेत्रात उल्लेखनीय कार्य करणारे शरद दामोदर लोहकरे यांची निवड करण्यात आली आहे.


ही निवड राष्ट्रीय संस्थापक अध्यक्षा डॉ. सौ. आशाताई पाटील यांच्या नेतृत्वाखाली तसेच महाराष्ट्र प्रदेशाध्यक्ष संभाजी देसाई यांच्या मार्गदर्शनाखाली राष्ट्रीय अध्यक्षांनी जाहीर केली. या निवडीबद्दल विविध पदाधिकाऱ्यांनी अभिनंदन करून पुढील वाटचालीस शुभेच्छा दिल्या. यामध्ये राष्ट्रीय महिला अध्यक्ष डॉ. ज्योती केदारे, राष्ट्रीय उपाध्यक्ष योगेश मालुंजकर, राष्ट्रीय सचिव हर्षद गायधनी, राष्ट्रीय संघटक ताराचंद ओसवाल, राष्ट्रीय मार्गदर्शक (माजी न्यायाधीश) विजय पाटील, राष्ट्रीय सल्लागार (अन्नधान्य भेसळ प्रतिबंध) अशोक गजानन कुंदप, राष्ट्रीय कार्यकारिणी सदस्य कुणाल भोसले, राष्ट्रीय विशेष मीडिया प्रमुख राजेंद्र लहाने, राष्ट्रीय सहसंपर्कप्रमुख संतोष रसाळकर आदींचा समावेश आहे. तसेच महाराष्ट्र प्रदेशाध्यक्ष (महिला) जानकी पराग नाईक, महाराष्ट्र प्रदेशाध्यक्ष (ग्रामीण) डॉ. राहत शेख, महाराष्ट्र प्रदेश सचिव सचिन सावंत, प्रदेश उपाध्यक्ष डॉ. विजय साखला, प्रल्हाद तळले, राज्य महासचिव हिरामण शिरसागर, प्रदेश मार्गदर्शक विजया शिंदे, सुरेश काळू गवळी, कायदेशीर सल्लागार (हायकोर्ट ड.) मंदार रानडे, महाराष्ट्र वैदिक शास्त्र अध्यक्ष डॉ. पारुल लाड यांच्यासह राज्य व जिल्हास्तरीय पदाधिकाऱ्यांनीही शुभेच्छा व्यक्त केल्या. महाराष्ट्रातील विविध विभागीय व जिल्हाध्यक्षांनीही लोहकरे यांच्या निवडीचे स्वागत करत सामाजिक कार्य अधिक बळकट होईल, असा विश्वास व्यक्त केला.



## २०२६ कडे वाटचाल : कृत्रिम बुद्धिमत्तेच्या युगातील करिअरच्या सुवर्णसंधी

**दै. आवाज वृत्तसेवा...**

आजच्या डिजिटल युगात तंत्रज्ञान शेतीचा अविभाज्य भाग बनले आहे आणि त्यामध्ये कृत्रिम बुद्धिमत्ता (-ींळषळलळरश्र खपींशश्रश्रळसशपलश) म्हणजेच -ख ची भूमिका अत्यंत महत्त्वाची ठरत आहे. -ख आधारित शेती म्हणजे केवळ यंत्रसामग्रीचा वापर नाही, तर डेटा, सेन्सर्स, स्मार्ट अल्गोरिदम आणि विश्लेषण यांच्या मदतीने शेती अधिक शास्त्रशुद्ध, नियोजनबद्ध आणि नफ्यातीत करणे होय. पारंपरिक शेतीमध्ये पावसाचा अंदाज, खताचे प्रमाण, कीड-रोग नियंत्रण आणि उत्पादनाचा अंदाज या सर्व गोष्टी अनिश्चिततेवर अवलंबून असायच्या; परंतु -ख तंत्रज्ञानामुळे या अनिश्चिततेवर मोठ्या प्रमाणात नियंत्रण मिळवता येऊ लागले आहे.



-ख प्रणाली हवामान, तापमान, आर्द्रता, जमिनीतील ओलावा आणि पिकांची वाढ यांचा सतत अभ्यास करून शेतकऱ्याला योग्य वेळी योग्य निर्णय घेण्यास मदत करते. जमिनीत बसवलेले सेन्सर्स मातीतील आर्द्रतेची अचूक माहिती देतात आणि त्यानुसार सिंचनाचे नियोजन करता येते. त्यामुळे पाण्याचा अपव्यय कमी होतो आणि पिकांना आवश्यक तेवढेच पाणी दिले जाते. यामुळे उत्पादन वाढते तसेच खर्चही कमी होतो. कीड आणि रोग व्यवस्थापनामध्ये देखील -ख मोठी भूमिका बजावत आहे. ड्रोन, कॅमेरे आणि इमेज विश्लेषण तंत्रज्ञानाच्या मदतीने पिकांवरील रोग किंवा कीड सुरुवातीच्या अवस्थेतच ओळखता येते. त्यामुळे वेळेवर योग्य फवारणी करता येते आणि रासायनिक औषधांचा अनावश्यक वापर टाळता येतो. यामुळे उत्पादनाची गुणवत्ता सुधारते आणि पर्यावरणाचे संरक्षण होते. -ख आधारित विश्लेषणामुळे बाजारभावांचा अंदाज घेणेही शक्य झाले आहे. मागणी आणि पुरवठा यांचे ट्रेंड, उत्पादनाचा अंदाज आणि साठवणूक यांचा अभ्यास करून शेतकरी योग्य वेळी आणि योग्य दराने आपला माल विकू शकतो. त्यामुळे आर्थिक स्थैर्य वाढण्यास मदत होते. तसेच मजुरी खर्च आणि वेळ वाचवण्यासाठी ऑटोमेशनचा वापर वाढत आहे. खत व्यवस्थापन, पाणी व्यवस्थापन आणि पिकांचे निरीक्षण या सर्व गोष्टी अधिक अचूक आणि कार्यक्षम पद्धतीने करता येतात. तथापि, -ख आधारित शेतीमध्ये काही अडचणीही आहेत. प्रारंभीचा खर्च तुलनेने जास्त असू शकतो आणि तंत्रज्ञानाची माहिती तसेच प्रशिक्षण आवश्यक असते. ग्रामीण भागात इंटरनेट सुविधा आणि नेटवर्कची उपलब्धता हीदेखील एक महत्त्वाची बाब आहे. परंतु योग्य मार्गदर्शन आणि शासकीय सहाय्य मिळाल्यास या अडचणी दूर करता येऊ शकतात. भविष्यात स्मार्ट सिंचन व्यवस्था, ड्रोन फवारणी, रिअल-टाइम मॉनिटरिंग, रोपांच्या वाढीचे विश्लेषण आणि -ख आधारित बाजार सॉफ्टवेअर यांचा मोठ्या प्रमाणावर वापर होईल. यामुळे शेती अधिक शाश्वत, पर्यावरणपूरक आणि आर्थिकदृष्ट्या सक्षम बनेल. -ख आधारित शेती ही केवळ आधुनिक तंत्रज्ञानाची देणगी नसून शेतकऱ्याच्या निर्णयक्षमतेला बळ देणारी आणि उत्पादनक्षमतेत वाढ करणारी क्रांती आहे. योग्य वापर आणि नियोजन केल्यास -ख भविष्यातील शेतीचे मजबूत आधारस्तंभ ठरेल.

जिल्हा अध्यक्ष
**भागिनाथ बाबासाहेब आसने**
ग्रीकल्चर जर्नलिस्ट असोसिएशन ऑफ इंडिया (AJAI)
अहिल्यानगर, महाराष्ट्र

# राष्ट्रीय सुरक्षा दिन

**दै. आवाज वृत्तसेवा...**

सार्वजनिक ठिकाणी आणि कामाच्या ठिकाणी आरोग्य आणि पर्यावरणीय पद्धतीबद्दल व सुरक्षा या संदर्भात जागरूकता वाढवण्यासाठी भारत देशामध्ये दरवर्षी चार मार्च रोजी राष्ट्रीय सुरक्षा दिन मोठ्या प्रमाणात साजरा केला जातो. या दिवशी भारतीय राष्ट्रीय सुरक्षा परिषदेच्या स्थापनेची स्मरण म्हणून हा दिवस पाळला जातो. राष्ट्रीय सुरक्षा दिन म्हणजे भारत देशामध्ये प्रतिबंधात्मक सुरक्षा संस्कृती मजबूत करण्याची एक प्रमुख उद्दिष्ट आहे. राष्ट्रीय सुरक्षा दिन म्हणजे आपल्या देशांतर्गत आणि बाह्य दोन्हीही धोक्यांपासून आपल्या राष्ट्राचे संरक्षण करणे हा प्रमुख उद्देश राष्ट्रीय सुरक्षा दिन साजरा करण्यात पाठीमागचे आहे. यामध्ये आपल्या भारत देशाचे सार्वभौमत्व; अखंडता आणि आपल्या भारत देशामध्ये वास्तव्य असलेल्या नागरिकाचे कल्याण करणे गोष्टींचा समावेश केला जातो. आपल्या भारत देशाचा राष्ट्रीय सुरक्षा दिन पाळण्याचा प्रमुख प्रमुख उद्देश म्हणजे भारत देशामध्ये शांतता आणि स्थिरता राखणे हा आहे...



**प्रा ज्ञानेश्वर कृष्णाजी बनसोडे**

आपल्या भारत देशातील राष्ट्रीय सुरक्षेचे महत्त्वपूर्ण उद्दिष्ट म्हणजे नागरिकांना सुरक्षिततेची आणि स्थिरतेची हमी देणे हे होय. सुरक्षा आणि स्थिरता यामध्ये आपल्या भारत देशातील सीमांची संरक्षण. आंतरिक सुरक्षा.आणि भारतीय भारतीय नागरिकाला महामानव डॉक्टर बाबासाहेब आंबेडकरांच्या संविधानाने जे मूलभूत हक्क दिलेले आहेत. त्या हक्काचे संवर्धन आणि जपणूक करणे हेआहे. आपल्या भारत देशामध्ये राष्ट्रीय सुरक्षा दिन साजरा करण्याची सुरुवात ४ मार्च १९७२ रोजी झाली आहे. त्याअगोदर १९६६ मध्ये सरकारच्या कामगार मंत्रालयाने राष्ट्रीय सुरक्षा परिषदेची स्थापना केली. या संघटनेने सन १९७२ मध्ये ४ मार्च हा दिवस राष्ट्रीय सुरक्षा दिन म्हणून साजरा करण्याचा निर्णय घेण्यात आला. राष्ट्रीय सुरक्षा परिषदेची आपल्या भारत देशातील सर्व समावेशक कुठल्याही प्रकारचा जात धर्म वंश भाषा असा भेदभाव न करता सर्वांच्या सुरक्षेसाठी ही राष्ट्रीय सुरक्षा परिषद काम करते. ही संस्था आपल्या भारत देशातील लोकांना त्यांच्या कामाच्या संदर्भात पुरेशी सुरक्षा व्यवस्था स्थापन करण्यास प्रवृत्त करीत असते. त्यांच्या सुरक्षिततेच्या ज्या काही अडचणी असतील; किंवा सुरक्षिततेच्या गुंतागुंतीची जाणीव करून देते. आपल्या भारत देशामध्ये कामाची अशी काही क्षेत्र आहेत की त्या ठिकाणी कामगार सुरक्षित नाही विविध अशा प्रकारच्या आपत्कालीन घटना त्या ठिकाणी घडत असतात. या ठिकाणी नागरिकांची सुरक्षितता ही धोक्यात येत असते. अनेक वेळा कर्मचाऱ्यांना कामाच्या ठिकाणी आपला जीव गमावा लागतो. किंवा अपघाताला बळी पडावे लागते. या सर्व बाबींचा बारकाईने विचार करून सुरक्षा परिषदेची स्थापना करण्यात आली आणि त्यातूनच राष्ट्रीय एकात्मता दिन साजरा करण्यात येऊ लागला. आपल्या देशाच्या भारतीय संविधानाने नागरिकांना मूलभूत अशा प्रकारचे हक्क दिले आहेत . कामगारांच्या संदर्भात देखील काही महत्त्वपूर्ण अशा प्रकारचे निर्णय लिखित स्वरूपामध्ये आहेत. भारतीय राज्यघटनेचे शिल्पकार महामानव डॉक्टर बाबासाहेब आंबेडकर यांनी कामगारांच्या संदर्भात अनेक विविध अशा प्रकारच्या सुख सुविधा संविधानामध्ये नमूद केलेल्या आहेत. कामगारांच्या हक्कावर कोणत्याही प्रकारची गदा येणार नाही याची देखील काळजी संविधानामध्ये नमूद केलेली आहे. या सर्व गोष्टींचे पालन राष्ट्रीय सुरक्षा परिषदेमध्ये केले जाते .आणि म्हणून भारतामध्ये दरवर्षी मोठ्या प्रमाणात राष्ट्रीय सुरक्षा दिन हा मोठ्या उत्साहामध्ये साजरा केला जातो.

शेवटी जाता जाता मी असे म्हणेल की आपली सुरक्षा केवळ आपली जबाबदारी आहे. सुरक्षा सोबत नातं तोडल्यास काळाआधी जीवन संपेल. जीवनात सुरक्षा सर्वतोपरी आहे. सुरक्षा विना सर्वच व्यर्थ आहे..

= =शेवटी माझ्या सर्व भारतवासीयांना राष्ट्रीय सुरक्षा दिनानिमित्त लाख लाख शुभेच्छा== =====जयहिंद====

**- प्राध्यापक ज्ञानेश्वर कृष्णाजी बनसोडे**
**(पोलीस क्राईम न्यूज ब्यूरो चीफ )**
**साकुरी, तालुका= राहाता,**
**जिल्हा=अहिल्यानगर**
**मो. ९६०४७९७३१६**

# पिंपळगाव लेपला डसन-डुकरीचा खेळ उत्साहात संपन्न

**दै. आवाज वृत्तसेवा...**

दिपक ढोकळे, पिंपळगाव लेप : प्रतिनिधी - येथील मारुती मंदिराच्या प्रांगणात होळीपुढे धुलीवंदनाच्या निमित्ताने मंगळवार दि.३ मार्च रोजी सायंकाळी ५ वाजता डसन-डुकरीच्या खेळाची गावातून सनई-संबळाच्या गजरात ग्रामस्थांनी भव्य मिरवणूक काढली होती.या डसन-डुकरीच्या खेळाची परंपरा पिंपळगाव लेप गावात कित्येक वर्षांपासून सुरू आहे. डसनची वेशभूषा साहेबराव रसाळ यांनी केली होती.तर डुकरीची वेशभूषा अंबादास रसाळ यांनी केली.या डसन-डुकरीयांनी काळे पोषाख परिधान करून तोंडाला काळे फासून दैत्यांचा मुखवटा तोंडावर लावला होता.डसन-डुकरी यांनी होळीतून प्रथमता राख सुपड्यामध्ये भरून ग्रामस्थांच्या अंगावर फेकून पैसे जमा केले. होळी निमित्ताने आनंदमय क्षण म्हणून गावातून सनई संबळाच्या चालावर यांच्यासह ग्रामस्थांनी नाचत बागडत गावातून भव्य मिरवणूक काढली होती. होळी उत्सव साजरा करण्यासाठी गावातील ग्रामस्थांनी लोक वर्गणीतून हा खेळ साजरा केला. डसन-डुकरी हा नर-मादीचा अवतार आहे. असे येथील जेष्ठ नागरिक सांगतात.होळी सणाचा आंनदाचा घेण्यासाठी धुलिवंदन म्हणून कोणी अंगाला राख लावतात तर कोणी रंग खेळतात मात्र डसन-डुकरीचा खेळ खेळल्यानंतरच या सणाचा आनंद ग्रामस्थांचा द्विगुणित होतो.या अनुषंगाने हा खेळ कित्येक वर्षांपासून सुरू आहे. हे पाहण्यासाठी गावातील ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते.



होळी सणानिमित्त दरवर्षी गावात धुलीवंदनाच्या दिवशी डसन-डुकरीचा खेळ खेळला जातो.आम्ही कोणतीही लाज न धरता काळे तोंड करून ग्रामस्थांना आनंद देण्यासाठी पुढे येतो.आमचा हेतू पैसे मिळविण्याचा नाही तर आनंद मिळण्यासाठी गावकऱ्यांच्या अंगावर राख टाकून जे पैसे मिळेल त्यातून आनंद द्विगुणित करतो .......श्री.अंबादास रसाळ..... वेशभूषा...डुकरीची

# भारतरत्न डॉ.बाबासाहेब आंबेडकर जयंती उत्सव समिती अध्यक्षपदी नागेश निकाळे




**दै. आवाज वृत्तसेवा...**

विंचूर - येथे भारतरत्न डॉ. बाबासाहेब यांची १३५ वी जयंती दि. १४ एप्रिल रोजी साजरी करण्यात येणार आहे. या पार्श्वभुमीवर डॉ. बाबासाहेब आंबेडकर जयंती उत्सव समितीची नुकतीच विंचूर येथे बैठक संपन्न झाली. यावेळी नुतन कार्यकारिणीची निवड जाहीर करण्यात आली.

**नुतन कार्यकारिणी पुढीलप्राणे -**

अध्यक्ष:- नागेश निकाळे
उपाध्यक्ष:- सोहम संसारे,सोनू मोरे
कार्याध्क्ष:- रोहित बागले,ऋषिकेश काळे
खजिनदार:- सचिन गायकवाड, महेश रणखांबे, करण निकाळे, गोकुळ जाधव, अभिलाष निकाळे, सचिव:- पृथ्वीराज रणखांबे बाळा साळवे अमोल निकाळे
सल्लागार:- योगेश नाना निकाळे मिलिंद वाघ, पप्पू आणा निकाळे, प्रीतम निकाळे रिकी खाणीझोड, मुकुंद निकाळे, सुनील घोडके, रणजीत साबळे, शुभम साळवे, गंगाधर रणखांबे, सूरज पगारे, विजेंद्र निकाळे, अनिल विंचूरकर, निलेश डावरे अमोल भोसले, अनिल डावरे, रफिक शेख, दर्शन भालेराव, नाना उबाळे, अदनान बेग, सुमित डावरे, केतन डावरे, वाल्मीक जाधव, प्रसाद विभुते, सोमनाथ साळवे, राहुल निकाळे, ऋतिक निकाळे.

## सायखेडा महाविद्यालयाच्या भूगोल विभागाची कुंदेवाडी कृषी संशोधन केंद्रास प्रक्षेत्र भेट

**दै. आवाज वृत्तसेवा...**

लासलगाव, प्रतिनिधी - राहुरी विद्यापीठाचे कुलगुरू डॉ.विलास खर्चे आणि संशोधन संचालक डॉ. प्रशांत बोडके यांचे मार्गदर्शनाखाली कृषी संशोधन केंद्र, कुंदेवाडी येथे रब्बी हंगामानिमित्त प्रक्षेत्र भेट व शिवार फेरीचे आयोजन करण्यात आले.

या उपक्रमात मराठा विद्या प्रसारक समाज, नाशिक संचलित सायखेडा महाविद्यालयाच्या भूगोल विभागातील विद्यार्थी व प्राध्यापकांनी सहभाग घेतला. या भेटीत भूगोल विभागातील १५ विद्यार्थी व ३ प्राध्यापक सहभागी झाले होते. संशोधन केंद्रातील उपक्रमांची माहिती व प्रत्यक्ष प्रक्षेत्र पाहून विद्यार्थ्यांनी समाधान व्यक्त केले. महाविद्यालयाचे प्राचार्य खालकर, उपप्राचार्य एस. व्ही. गोसावी आणि विभागप्रमुख डॉ. एस. डी. पगार यांचे मार्गदर्शनाखाली प्रा.के.एस.गोपाळे, प्रा.आर. एन.नाठे व प्रा.पी. एस. भंडारे यांनी भेटीचे यशस्वी आयोजन केले. याप्रसंगी संशोधन केंद्राचे प्रमुख प्रा. भालचंद्र म्हस्के, प्रभारी गहू विशेषज्ञ डॉ. निलेश मगर, गहू पैदासकार प्रा.संजय चितोडकर आदी उपस्थित होते.

दररोज वाचा दैनिक आवाज

हे पत्रक मालक, मुद्रक, संपादक, प्रकाशक, भगवान नामदेव सोनवणे यांनी शार्प ऑफसेट, मालेगांव बस स्टँड समोर, मालेगांव येथे छापून ढासे मळा, सावता नगर, नांदगांव ता.नांदगांव, जि.नाशिक येथे प्रकाशित केले. सहसंपादक भाऊसाहेब हुजबंद. या अंकात प्रसिध्द झालेल्या बातम्या, लेख, जाहिराती यामधून व्यक्त झालेल्या मतांशी मालक, मुद्रक, प्रकाशक, संपादक, सहसंपादक सहमत असतीलच असे नाही. मुद्रण दोष संभवनीय. (नांदगांव न्यायकक्षेत) सर्व अधिकार सुरक्षित. मो. ९५४५९१०१७७ - ९२७२४५३९२१ email : nandgaonawaz@gmail.com

# अबॅकस राष्ट्रीय स्पर्धेत सिद्धिविनायकची बाजी

**दै. आवाज वृत्तसेवा...**

पुणे येथील गणेश कला क्रीडा मंच येथे पार पडलेल्या प्रोॲक्टिव्ह अबॅकस राष्ट्रीय स्पर्धेत लासलगाव येथील अर्चित सचिन राऊत याने अवघ्या ५ मिनिटांत १०० पैकी १०० गणिते व शिवांश विलास चव्हाणके ४ मिनिटांत १०० पैकी १०० गणिते अचूक सोडवत देशात प्रथम क्रमांक पटकावला आहे. देशभरातील विविध राज्यांमधील सुमारे ६ हजार विद्यार्थ्यांनी सहभाग घेतलेल्या या स्पर्धेत सिद्धिविनायक कॉम्प्युटर्स अँड प्रोॲक्टिव्ह अबॅकसचे ४१ विद्यार्थी सहभागी झाले होते. त्यापैकी तब्बल ३० विद्यार्थ्यांनी राष्ट्रीय क्रमांक मिळवत उल्लेखनीय यश संपादन केले. शिवांश विलास चव्हाणके व अर्चित सचिन



राऊत यांना प्रथम क्रमांकाबद्दल ट्रॉफी, प्रमाणपत्र व सायकल देऊन सन्मानित करण्यात आले. त्याच्या या यशामुळे लासलगाव चे नाव देशभरात उज्ज्वल झाले आहे. स्पर्धेत आराध्या राहुल शिंदे, ओम अतुल विसपुते, देवांश सागर कचवे, सौंदर्या रवींद्र दरेकर यांनी देशात द्वितीय क्रमांक मिळवला. आरवी दिपक महेवर, ऋषी शिवाजी विसपुते, चैताली रुषिकेश मोरे, प्रज्वल प्रमोद काळे, शिवराज बबन घनघव, श्रीशा लखन मोगल, सार्थक महेंद्र वाणी, सिद्धार्थ मंगेश आव्हाड, स्वानंदी रवींद्र शिंदे तृतीय, विराज सांगळे, सान्वी योगेश काळे चतुर्थ. ओवी निलेश पवार, हंसराज रुषिकेश मोरे पाचवा, मानसी सोमनाथ देवकाते, साहिल मंगेश शिंदे सहावा, अनुष्का नामदेव कदम, आयुष योगेश भालेराव सातवा, श्रेयस किरण आहेर नववा, जिवा महेश भोकनाळ दहावा, आराध्या संदिप हराळे ज्ञानेश्वरी सचिन पवार अकरावा, प्रणव जयेश सूर्यवंशी बारावा, जुई आनंद आढाव चौदावा, वेदांत संदेश साळुंके पंधरावा . तसेच स्वानंद शिरसाठ, काव्या किशोर दरेकर, तेजस कालिदास आवारे, दीपश्री दत्तात्रय दरेकर, माहिर सिकंदर पठाण, रुद्राक्ष योगेश गलांडे, शांभवी उज्वल शेलार, शिवार्थ श्रीराम दिंडोरकर, श्रद्धा सोमनाथ घुगे, श्रुतिका योगेश गलांडे, स्वराज राहुल शिंदे या विद्यार्थ्यांना बेस्ट परफॉर्मर ट्रॉफी देऊन गौरविण्यात आले. या सर्व यशस्वी विद्यार्थ्यांचे प्रोॲक्टिव्ह अबॅकसचे गिरीश करडे सर , अजय मणियार सर, राज लोचानी सर सारिका करडे मेडम, ज्तयोती मनियार मेडम सिद्धिविनायक कॉम्प्युटर्स अँड प्रोॲक्टिव्ह अबॅकसच्या संचालिका सौ कांचन गलांडे यांनी कौतुक केले.

ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांनीही योग्य मार्गदर्शन आणि मेहनतीच्या जोरावर राष्ट्रीय स्तरावर उल्लेखनीय यश मिळवू शक्तात, याचे हे उदाहरण ठरले आहे. भविष्यातही अशाच प्रकारे अधिकाधिक विद्यार्थ्यांना राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय स्तरावरील स्पर्धांमध्ये सहभागी करून त्यांच्या गुणवत्तेला योग्य व्यासपीठ उपलब्ध करून देण्याचा संकल्प सिद्धिविनायक अबॅकस क्लासचे संचालक श्री योगेश नरहरी गलांडे यांनी केला आहे. मोलाचे सहकार्य आरती कानडे, अश्विनी केदारे यांचे लाभले.

*****

## बाभुळगाव कृषी महाविद्यालयाचे मुखेड येथे रासेयोच्या शिबिराचे आयोजन



**दै. आवाज वृत्तसेवा...**

लक्ष्मण घुगे राजापूर प्रतिनिधी : जगदंबा शिक्षण संस्था संचलित महात्मा फुले कृषी विद्यापीठ राहुरी मान्यताप्राप्त बाभुळगाव येथील कृषी महाविद्यालयाचे राष्ट्रीय सेवा योजनेचे सात दिवसीय श्रमसंस्कार शिबिर मुखेड येथे पार पडले. या अंतर्गत विविध सामाजिक उपक्रमांसह शेतकऱ्यांना शेतीविषयक मार्गदर्शन करण्यात आले. मुखेड गावचे उपसरपंच बाबासाहेब गुंड व ज्येष्ठ नेते पानसरे यांच्या हस्ते शिबिराचे उद्घाटन करण्यात आले. कृषी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ डी. पी. कुळधर अध्यक्षस्थानी होते. या शिबिरामध्ये ग्राम स्वच्छता,वृक्षारोपण, व्यसनमुक्ती,योग अभ्यास,चित्रकला, सांस्कृतिक कार्यक्रम, आरोग्य तपासणी, वृक्ष संवर्धन, मंदिर परिसर सुशोभीकरण, पटनाथ्याचे सादरीकरण आदी उपक्रम राबविण्यात आले. यादरम्यान विद्यार्थ्यांसाठी शेतकऱ्यांच्या प्रक्षेत्रावर मार्गदर्शन पर व्याख्याने आयोजित करण्यात आले होते. प्राचार्य डॉ. डी. पी. कुळधर यांनी शाश्वत विकासासाठी युवक तसेच गोशाळेचे महत्व, गाईंना चारा नियोजन गाईंची देखभाल व व्यवस्थापन, जैविक शेतीतील गाईंचे योगदान, शेण-गोमूत्राचे उपयोग याविषयी विद्यार्थ्यांना आणि ग्रामस्थांना मार्गदर्शन केले. प्रा. ए. व्ही. ठोंबरे यांनी जलसंवर्धन काळाची गरज आणि सिंचनाचे व्यवस्थापन याविषयी मार्गदर्शन केले. विद्यार्थ्यांनी व्यसनमुक्ती आणि महिला सबलीकरण पटनाथ्याचे सादरीकरण केले. शिबिरादरम्यान विद्यार्थ्यांनी शेतकऱ्यांच्या शेती व पीक पद्धती विषयक समस्यांचे शास्त्रोक्त पद्धतीने मार्गदर्शन करून निरसन केले. कार्यक्रमाला मुखेड येथील ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते. शिबिर यशस्वी पार पाडण्यासाठी कार्यक्रम अधिकारी प्रा. ए. व्ही. ठोंबरे,एम. एस. पेंढारी, पी. एन. सानप तसेच रासेयोच्या स्वयंसेवकांनी मेहनत घेतली.

# बाभूळगावच्या एसएनडी फार्मसी महाविद्यालयात वार्षिक स्नेहसंमेलन उत्साहात

### विविध गुणदर्शनातून व्यक्तिमत्व विकासासोबत शैक्षणिक गुणवत्ता वाढवावी – रुपेश दराडे

**दै. आवाज वृत्तसेवा...**

लक्ष्मण घुगे राजापूर प्रतिनिधी : विद्यार्थ्यांनी शैक्षणिक गुणवत्तेबरोबरच आपल्यातील कला, क्रीडा, कौशल्य व विविध गुण प्रदर्शित करत महाविद्यालयातील विविध उपक्रमात सहभाग नोंदवावा.व्यक्तिमत्व विकासासाठी या गोष्टी महत्त्वाच्या असून या माध्यमातूनच शैक्षणिक गुणवत्ता ही अधिक बहरते किंबहुना आयुष्यात यशस्वी होण्यासाठी या सगळ्या गोष्टी नेहमी दिशादर्शक ठरतात असे प्रतिपादन जगदंबा एज्युकेशन सोसायटीचे संचालक तथा नगरसेवक रुपेश दराडे यांनी केले. बाभूळगाव येथील एस.एन.डी.इन्स्टिट्यूट ऑफ फार्मसी महाविद्यालयाचे वार्षिक स्नेहसंमेलन मोठ्या उत्साहात आणि जल्लोषात संपन्न झाले. स्नेहसंमेलनाच्या उद्घाटन प्रसंगी श्री. दराडे बोलत होते. अध्यक्षस्थानी महाविद्यालयाच्या प्राचार्य वंदना संचेती होत्या. प्रमुख पाहुणे म्हणून रुपेश दराडे तसेच एस.एन.डी. पॉलीटेक्निक महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ.यु.बी.जाधव, एस.एन.डी.कॉलेज ऑफ फार्मसी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ.पाटील,कृषी महाविद्यालयाचे प्राचार्य




डॉ.दिनेश कुळधर उपस्थित होते.

स्नेहसंमेलनात सहभागी फार्मसीच्या विद्यार्थ्यांनी विविध सांस्कृतिक कार्यक्रम सादर करून उपस्थितांची मने जिंकली. नृत्य, गीते, नाटिका,फॅशन शो,पारंपरिक वेशभूषेतील लोकनृत्य, आधुनिक नृत्यप्रकार, समूहगायन, एकांकिका, फॅशन शो तसेच वाद्यवृंद सादरीकरणांनी प्रेक्षकांची दाद मिळवली.

यावेळी शैक्षणिक, क्रीडा आणि सांस्कृतिक क्षेत्रात उल्लेखनीय कामगिरी करणाऱ्या विद्यार्थ्यांचा मान्यवरांच्या हस्ते प्रमाणपत्रे व स्मृतिचिन्हे, विविध स्पर्धातील विजेत्यांना पारितोषिके देऊन गौरविण्यात आले.

महाविद्यालयाने नेहमीच ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांच्या व्यक्तिमत्त्व विकास, कौशल्यांना विविध व्यासपीठावर संधी व करिअरला प्राधान्य दिले आहे हे स्पष्ट करत प्रगतीचा अहवाल प्राचार्य संचेती यांनी यावेळी मांडला.

सांस्कृतिक विभाग प्रमुख ए.डी. हरपडे आणि श्रीमती के.एस.पगारे यांनी कार्यक्रमाचे नियोजन केले.

***

# कवी काशिनाथ गवळी यांना साहित्य क्षेत्रातील योगदानाबद्दल पुरस्कार जाहीर

**दै. आवाज वृत्तसेवा...**

नांदगाव – येथील कवी व गझलकार काशिनाथ गवळी यांना साहित्य क्षेत्रातील उत्कृष्ट कामगिरी बद्दल शिवसेनेच्या वतीने स्व. शिवसेनाप्रमुख श्रीमान बाळासाहेब ठाकरे यांच्या स्मृतिप्रीत्यर्थ दिला जाणारा गुणवंत साहित्यिक पुरस्कार देऊन गौरविण्यात येणार असल्याचे मा. नगरसेवक भगूर नगरपालिका व एन. डी. एस. टी. सोसायटीचे संचालक मा. संग्राम करंजकर यांनी जाहीर केले आहे. पुरस्कारासाठी निवड झाल्याचे पत्र कवी काशिनाथ गवळी यांना नुकतेच प्राप्त झाले आहे.

कवी व गझलकार काशिनाथ गवळी हे कै.पुंडलिक पांडुरंग मवाळ विद्यालय पिंपरखेड ता. नांदगाव जि. नाशिक येथे मुख्याध्यापक या पदावर कार्यरत असून कला, क्रिडा संगीत व साहित्य हे त्यांच्या आवडीचे क्षेत्र आहेत. आतापर्यंत त्यांचे 'बाप बळीचिया बळे' व 'जाणीवगर्भ'



हे दोन काव्यसंग्रह व पाच प्रातिनिधिक काव्यसंग्रह व गझलसंग्रह प्रकाशित आहेत. आतापर्यंत त्यांना शैक्षणिक, सामाजिक व साहित्य क्षेत्रातील अनेक पुरस्कार मिळाले आहेत. अनेक महत्त्वाच्या मासिकातून व वर्तमान पत्रातून त्यांच्या साहित्याला प्रसिद्धी मिळाली आहे.

कवी काशिनाथ गवळी यांनी विविध शाळा,महाविद्यालयांना भेटी देऊन ग्रामीण भागात साहित्य चळवळ रूजविन्यासाठी सातत्याने प्रयत्न केले आहेत. आतापर्यंत त्यांनी ग्रामीण ते शहरी भागात अनेक कवी संमेलने व गझल मुशायरे यशस्वीरित्या संपन्न केले आहेत. कवी काशिनाथ गवळी यांनी अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलने, गझल मुशायरे व कवी संमेलनांमध्ये महत्त्वपूर्ण सहभाग नोंदविला आहे. त्यांच्या अनेक रचनांनी श्रोत्यांना मंत्रमुग्ध केले आहे.

तसेच कवी काशिनाथ गवळी अनेक साहित्यिक संस्थाचे संचालक असून त्यांना व त्यांच्या साहित्याला अनेक मानाचे पुरस्कार प्राप्त झाले आहेत. त्यांच्या या निवडीबद्दल शिक्षण,साहित्यादी सर्वच स्तरातून कौतुक होत आहे. मार्च महिन्यात लवकरच एका समारंभात मान्यवरांच्या उपस्थितीत पुरस्कार वितरण सोहळा संपन्न होईल असे आयोजकांनी कळवले आहे.

## मॉडर्न माध्यमिक विद्यालयात राष्ट्रीय विज्ञान दिवस उत्साहात साजरा

**दै. आवाज वृत्तसेवा...**

मॉडर्न एज्युकेशन सोसायटी संचलित माध्यमिक विद्यालय अशोक नगर शाळेत दिनांक २८ फेब्रुवारी रोजी डॉ.सी.व्ही रमण यांच्या स्मरणार्थ राष्ट्रीय विज्ञान दिन साजरा करण्यात आला. या कार्यक्रमाप्रसंगी प्रमुख अतिथी विद्यालयाचे मुख्याध्यापक माननीय डॉ.श्री.अनिल माळी सर होते. यांच्या हस्ते डॉ.सी. व्ही रमण यांच्या प्रतिमेचे पूजन करण्यात आले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन इयत्ता नववीच्या विद्यार्थिनी वैभवी मोरे व मोहिनी लोहार यांनी केले. डॉ.सी.व्ही रमण यांच्या रमण इफेक्ट या संदर्भात त्यांच्या कार्याविषयी इयत्ता आठवी अ चे विद्यार्थी दुर्गेश पवार, ओंकार सूर्यवंशी, गणेश सोनार, प्रतीक गायकवाड, वंश सूर्यवंशी यांनी मराठी,इंग्रजी, संस्कृत, हिंदी विविध भाषांमध्ये माहिती दिली. त्यानंतर विद्यालयाच्या उपशिक्षिका सौ.क्षीरसागर यांनी डॉ. सी.व्ही.रमन यांच्या जीवनाविषयी तसेच रामन इफेक्ट साठी त्यांना नोबेल पुरस्कार देण्यात आला हे ही त्यांनी सांगितले. तसेच श्रीमती पवार यांनी जीवनातील प्रत्येक गोष्टी मागे असलेले विज्ञान एका बोधकथेतून समजावले.राष्ट्रीय विज्ञान दिनानिमित्त इयत्ता आठवी व नववीच्या विद्यार्थ्यांनी विज्ञानातील मूलभूत संकल्पनेचे कार्ड बनवून त्यांचेही प्रदर्शन मांडण्यात आले. जेणेकरून विद्यार्थ्यांच्या मूलभूत संकल्पना लक्षात राहतील. आठवी अ च्या विद्यार्थ्यांनी विविध फळांचे फुलांचे औषधी उपयोग यांची माहिती युक्त संकलनाचेही प्रदर्शन मांडण्यात आले. दिनाच्या अनुषंगाने विद्यालयाचे मुख्याध्यापक माननीय डॉ. श्री अनिल माळी सर यांचेही विद्यार्थ्यांना अनमोल मार्गदर्शन लाभले. अशा प्रकारे मोठ्या उत्साहात राष्ट्रीय विज्ञान दिन साजरा करण्यात आला. कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी सौ. निलांबरी क्षीरसागर, श्रीमती मनीषा पाटील, श्री भगवान चोरमले, श्रीमती पूनम पवार, श्रीमती दिपाली शार्दुल यांनी परिश्रम घेतले. तसेच सर्व शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी यांचे सहकार्य लाभले.


# निफाड तालुक्यातील सोनेवाडी खुर्द ठरले पहिले 'ऑनलाईन रेशनकार्ड गाव'

## महसूल समाधान शिबीर अभियानातून डिजिटल पारदर्शकतेकडे महत्त्वाचे पाऊल

**दै. आवाज वृत्तसेवा ...**
लासलगाव, प्रतिनिधी –

छत्रपती शिवाजी महाराज महसूल समाधान शिबीर अभियान' अंतर्गत निफाड तालुक्यात नावीन्यपूर्ण उपक्रम राबविण्यात आला असून, सोनेवाडी खुर्द हे गाव तालुक्यातील पहिले 'ऑनलाईन रेशनकार्ड गाव' म्हणून घोषित करण्यात आले आहे. या उपक्रमामुळे शिधापत्रिका धारकांना अधिक सुलभ, पारदर्शक आणि तंत्रज्ञानाधारित सुविधा उपलब्ध होणार आहेत.

दुर्गामाता महिला बचत गट येथील रास्तभाव दुकानाचा परवानाधारक असून, गावातील सर्व पात्र लाभार्थ्यांची माहिती डिजिटल पद्धतीने अद्ययावत करण्यात आली आहे. शिधापत्रिकांची ऑनलाईन नोंदणी, आधार संलग्नता आणि बायोमेट्रिक प्रणालीद्वारे धान्य वितरणाची अंमलबजावणी पूर्ण करण्यात आली आहे. गावात एकूण १११ शिधापत्रिकाधारक असून, त्यामध्ये एकूण ४५ सदस्य असलेल्या १२ अंत्योदय अन्न योजना शिधापत्रिका आणि ३७८ सदस्य संख्या असलेल्या ९९ प्राधान्य कुटुंब योजना शिधापत्रिका यांचा समावेश आहे. गावात एकूण लाभार्थी सदस्य संख्या ४२३ इतकी आहे. या सर्व लाभार्थ्यांना आता अंगठ्याच्या ठशावर धान्य वितरण करण्यात येत असून, धान्य मिळाल्यानंतर त्वरित एसएमएसद्वारे माहिती प्राप्त होत आहे.



डिजिटल युगात ई - शिधापत्रिका हे स्मार्ट रेशन कार्डच्या दिशेने पहिले पाऊल ठरत आहे. या प्रणालीमुळे व्यवहारात पारदर्शकता वाढली असून, धान्य वितरणाची नोंद रिअल - टाइम पद्धतीने होत असल्याने लाभार्थ्यांना त्यांच्या हक्काचे धान्य वेळेवर मिळण्याची खात्री निर्माण झाली आहे. माहिती अद्ययावत करणे, नाव दुरुस्ती, सदस्य वाढवणे किंवा कमी करणे ही कामेही ऑनलाईन पद्धतीने सुलभ झाली आहेत. या उपक्रमाच्या यशस्वी अंमलबजावणीसाठी पुरवठा निरीक्षण अधिकारी अतुल गायकवाड, पुरवठा निरीक्षक उल्हास टर्ले यांनी समन्वय साधला. ग्रामस्थ, महिला बचत गट आणि प्रशासन यांच्या संयुक्त प्रयत्नातून हा डिजिटल बदल शक्य झाला आहे.

** सोनेवाडी खुर्दचे 'ऑनलाईन रेशनकार्ड गाव' म्हणून झालेले रूपांतर हे निफाड तालुक्यासाठी सकारात्मक पाऊल मानले जात असून, ग्रामीण भागात डिजिटल व्यवस्थेची अंमलबजावणी करण्याच्या दृष्टीने हा उपक्रम मार्गदर्शक ठरणार आहे. ****

डिजिटल प्रणालीमुळे पारदर्शकता वाढते आणि नागरिकांचा शासनावरील विश्वास दृढ होतो. सोनेवाडी खुर्दने तालुक्यात एक आदर्श निर्माण केला आहे. इतर गावांनीही या पद्धतीचा अवलंब करावा, अशी अपेक्षा आहे.

– डॉ.शशिकांत मंगरुळे, प्रांताधिकारी, निफाड

**** महसूल समाधान शिबीर अभियानाच्या माध्यमातून विविध सेवा गावपातळीवर देण्याचा प्रयत्न सुरू आहे. त्याच अनुषंगाने सोनेवाडी गावातील जुन्या, फाटलेल्या व जीर्ण शिधापत्रिका बदलून ई - शिधापत्रिका तयार करण्यात आल्या आहेत. नागरिकांना या शिधापत्रिका आर.सी.एम.एस पोर्टलवरूनही डाउनलोड करता येतील. ई-शिधापत्रिका बाबत जनजागृती करण्याच्या उद्देशाने सोनेवाडी गावात कॅम्प मोडवर हा उपक्रम राबविण्यात आला आहे.

– विशाल नाईकवाडे, तहसीलदार, निफाड

# प.प. तुकाराम बाबा विद्यालय इ. १० वीच्या १९९७ बॅचचे स्नेहसंमेलन संपन्न

## एकमेकांना भेटले सवंगडी तब्बल २८ वर्षांनंतर

**दै. आवाज वृत्तसेवा...**
लासलगाव, प्रतिनिधी

मावळ तालुक्यातील पवना धरण (पुणे) येथे परमपूज्य तुकाराम बाबा विद्यालय, खेडले झुंगे ता. निफाड जि. नाशिक येथील इयत्ता दहावी १९९७ बॅचच्या विद्यार्थ्यांचे स्नेहसंमेलन उत्साहात, निसर्गरम्य वातावरणात संपन्न झाले. तब्बल २८ वर्षांनंतर सर्व मित्र एकत्र आल्याने हा दिवस खरोखरच अविस्मरणीय ठरला.




बालपणापासून ते दहावीपर्यंतच्या आठवणींना पुन्हा एकदा उजाळा मिळाला. हसणं, गप्पा, जुन्या आठवणी आणि ते निरागस क्षण यामुळे सर्वांचे मन भारावून गेले. यापुढेही आपण सर्वजण एकमेकांच्या सुख-दुःखात सहभागी होऊ आणि असा मी - असा मी म्हणण्याऐवजी आपण सगळे एकत्र या भावनेने एकमेकांना मदतीचा हात देऊ, असा निर्धार सर्वांनी व्यक्त केला. मैत्री हीच आयुष्याची खरी श्रीमंती असल्याची भावना यावेळी व्यक्त करण्यात आली. कार्यक्रमात सर्व मित्रांना सन्मानित करण्यासाठी संत निवृत्तीनाथ महाराज देवस्थान ट्रस्ट, त्र्यंबकेश्वर अध्यक्ष अॅड सोमनाथ घोटेकर यांनी संत निवृत्तीनाथ महाराज यांच्या प्रतिमा देऊन केला. तसेच डॉ. नितीन भालेराव यांनी सर्वांना टी-शर्ट भेट देत मैत्रीचा आनंद द्विगुणित केला. विशेष म्हणजे मित्र नवनाथ नागरे यांनी सर्वांना आगळी-वेगळी भेटवस्तू देऊन कार्यक्रमाची रंगत वाढवली. विनायक सोनवणे यांनी शाळेचा अत्यंत आकर्षक बॅनर तयार करून आणल्याने उपस्थितांना पुन्हा शाळेत आल्याचा भास झाला आणि फोटोशूटसाठीही सुंदर वातावरण निर्माण झाले.

पंकज गांगुर्डे व योगेश अष्टेकर यांनी अत्यंत उत्तम पद्धतीने नियोजन केले यावेळी कार्यक्रमाची शोभा वाढविणाऱ्या सर्व मित्रांचे मनःपूर्वक आभार व्यक्त करण्यात आले. यावेळी शरद लोहकरे, दत्तात्रय घोटेकर, नंदकिशोर परदेशी, पंकज चितोडकर, प्रकाश नागरे, प्रकाश अष्टेकर, मच्छिंद्र हागोटे, किरण आडसरे, गणेश जोंधळे, संतोष बागुल, सोमनाथ घोटेकर, विजय नागरे, केदारनाथ शंखपाळ, पांडुरंग नागरे, बाळासाहेब घोटेकर, रामेश्वर शंखपाळ, यादव साबळे, रंगनाथ नागरे, बापू हागोटे, बाबासाहेब घोटेकर, किरण घोटेकर आदी मित्रपरिवार उपस्थित होता.

कार्यक्रम सुरळीत पार पडावा यासाठी सर्व मित्रांनी घेतलेले विशेष परिश्रम कौतुकास्पद ठरले.कार्यक्रमाच्या शेवटी नक्कीच पुन्हा भेटू या आश्वासनासह स्नेहसंमेलनाची सांगता करण्यात आली.




# हिंदू धर्म आणि संस्कृतीचे जतन करणे ही काळाची गरज : ह.भ.प. गुरुवर्य महंत रामगिरी महाराज

**दै. आवाज वृत्तसेवा...**
शरद लोहकरे, लासलगाव

हिंदू धर्म आणि संस्कृतीचे जतन करणे ही काळाची गरज असून, मूल्यांच्या संवर्धनासाठी समाजाने संघटित होणे आवश्यक आहे, तसेच धर्म संस्कृती आणि एकतेसाठी सर्वांनी एकत्र यावे , असे प्रतिपादन सरला बेटाचे मठाधिपती ह.भ.प. गुरुवर्य महंत रामगिरी महाराज यांनी केले. खेडलेझुंगे येथील प्रसिद्ध १११ फूट अभय वरद हनुमान मूर्तीसमोर (नक्षत्रवन) आयोजित भव्य 'हिंदू महासंमेलनात' ते मुख्य मार्गदर्शक म्हणून बोलत होते.

आपला परिवार हीच आपली शक्ती आहे, मात्र विदेशी शक्तींमुळे कुटुंब विभक्त होत आहेत. लव्ह जिहादसारख्या कारणांमुळे हिंदू परिवार विस्कळीत होत असून, मुलींची संख्या कमी होणे ही चिंतेची बाब आहे. भारताला पुन्हा विश्वगुरू बनवण्यासाठी आणि हिंदू राष्ट्राचे स्वप्न साकारण्यासाठी महाराणा प्रताप, छत्रपती शिवाजी महाराज, धर्मवीर संभाजी महाराज आणि सम्राट अशोक यांचेसह अनेक महापुरुषांच्या विचारांची शपथ घेऊन सर्वांनी संघटित व्हावे असे आवाहन विश्व हिंदू परिषदेचे (ठाणे जिल्हा) अध्यक्ष ह.भ.प. एकनाथ महाराज सदगीर यांनी केले.

राष्ट्रीय स्वयंसेवक संघाचे नाशिक विभाग बौद्धिक प्रमुख कृष्णाजी चंद्रकांत घरोटे यांनी समाज प्रबोधन करत उपस्थितांना मार्गदर्शन केले, तर केशव महाराज शास्त्री यांनी धर्माची व्याख्या स्पष्ट करून अज्ञानाकडून ज्ञानाकडे जाण्याचा मार्ग सांगितला. तसेच त्यांनी राष्ट्रीय स्वयंसेवक संघाबाबत माहिती दिली. प्रत्येक गावात संघाच्या शाखा सुरु करून जनतेची व देशाची सेवा करावी असे आवाहन त्यांनी यावेळी केली. यावेळी माजी जिल्हा परिषद सदस्य अमृता पवार यांनी उपस्थितांना मार्गदर्शन केले

श्री क्षेत्र खेडले झुंगे येथे हिंदू संमेलनाचे भव्य आयोजन उत्साहपूर्ण वातावरणात करण्यात आले. या संमेलनाला परिसरातील गावांमधून मोठ्या संख्येने हिंदू बांधव, महिला, युवक आणि ज्येष्ठ नागरिक उपस्थित होते. संपूर्ण परिसर भगव्या ध्वजांनी व आकर्षक फलकांनी सजविण्यात आला होता.



कार्यक्रमाची सुरुवात दीपप्रज्वलन व वेद मंत्रांच्या पठणाने करण्यात आली. उपस्थित मान्यवरांनी हिंदू संस्कृती, परंपरा, धर्मरक्षण आणि सामाजिक एकतेचे महत्त्व अधोरेखित केले. आजच्या बदलत्या काळात युवकांनी आपल्या संस्कृतीचा अभिमान बाळगून समाजकार्यात पुढाकार घ्यावा, असे आवाहन वक्त्यांनी केले.

संमेलनात विविध सामाजिक विषयांवर मार्गदर्शन करण्यात आले. हिंदू समाजातील एकजूट, संस्कारांची जपणूक, व्यसनमुक्ती, शिक्षणाचे महत्त्व तसेच सामाजिक बांधिलकीयावरसखोलचर्चाझाली.

या महासंमेलनासाठी निफाड, सिन्नर, कोपरगाव तालुक्यातुन हजारो हिंदू बांधव उपस्थित होते. यावेळी महिलांची व तरुणांची उपस्थिती लक्षणीय होती. १११ फूट हनुमान मूर्तीसमोरचा परिसर जनसागराने पूर्णपणे फुलून गेला होता. पसायदान आणि जयश्री राम च्या जय घोषने कार्यक्रमांची सांगता झाली.

कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी खेडलेझुंगे देवगाव हिंदू संमेलन समितीच्या कार्यकर्त्यांनी विशेष परिश्रम घेतले. गावातील प्रमुख प्रवेशद्वारांवर करण्यात आलेली पार्किंग व्यवस्था आणि स्वयंसेवकांच्या चोख नियोजनामुळे एवढी मोठी गर्दी असूनही शिस्तबद्ध पद्धतीने कार्यक्रम पार पडला. या संमेलनामुळे समाजात एकीची भावना निर्माण होऊन संस्कृतीचे रक्षण होण्यास मोठा हातभार लागेल, उपस्थित नागरिकांनी कार्यक्रमाचे कौतुक करून भविष्यातही अशा प्रकारच्या उपक्रमांचे आयोजन करण्याची अपेक्षा व्यक्त केली तसेच एकात्मता आणि सकारात्मक ऊर्जा निर्माण झाल्याची भावना उपस्थितांनी व्यक्त केली.लासलगाव पोलीस प्रशासनाने चोख बंदोबस्त पार पाडण्यासाठी विशेष परिश्रम घेतले . सूत्रसंचालन आणि आभार प्रदर्शन येथील संघाचे स्वयंसेवक पंकज घोटेकर यांनी केले.